MHAH230005162019

नियमीत दिवाणी दावा क्रमांक २१४/२०१९

संगीता सुदाम शिंदे
विरुध्द
१. रंगनाथ तुकाराम आढाव व इतर

**निशाणी क्र.५५ वरील आदेश**

[०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २, ४, ७ ते ९ यांनी त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झाल्याने त्यांनी एकतर्फा आदेश रदद होऊन मिळणेकामी विनंती अर्ज सादर केलेला आहे.

[०२] प्रतिवादी क्र. २, ४, ७ ते ९ यांचे असे कथन आहे की, सदर प्रकरणात वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये तडजोड झालेली आहे. प्रकरण स्थावर मिळकतीसंबंधी असल्याने त्यामध्ये त्यांचे हक्क गुंतलेले आहेत. सदरचा एकतर्फा आदेश रदद न झाल्यास प्रतिवादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल.

[०३] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जावर म्हणणे सादर करत असे कथन केले की, प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

[०४] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०५] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०६] प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव व वाटप होऊन कब्जा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र. २, ४, ७ ते ९ हे सदर प्रकरणात हजर न झाल्यामुळे त्यांच्या विरुध्द दिनांक १५-१२-२०२२ रोजी निशाणी १ वर त्यांच्याविरुध्द एकतर्फाचे आदेश पारीत केले होते. परंतू दाव्याचा योग्य न्यायनिवाडा होण्याकरीता प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. मात्र आज रोजी पावेतो प्रस्तुतच्या दाव्याची सुनावणी सुरु झालेली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. २, ४, ७ ते ९ यांच्या विरुध्द झालेला एकतर्फाचे आदेश योग्य तो खर्च लादुन रद्द करणे, न्यायोचित होईल. एकुणच वरील कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**(१)** अर्ज रक्कम रुपये २००/- इतका खर्च वादीला देण्याच्या

अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

**(३)** प्रतिवादी क्र. २, ४, ७ ते ९ यांच्याविरुध्द झालेला एकतर्फाचे आदेश याद्वारे रदद करण्यात येत आहे.

**(४)** प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. २, ४, ७ ते ९ यांनी सोसावा.

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2026.01.07 17:44:39 +0530

(प्रविण वि. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

दिनांक:- ०७-०१-२०२६.

**-: <u>प्र मा ण प त्र</u> :-**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन.डी.दावत (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नांव | : | सह दिवाणी न्यायाधीश तथा<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा,<br>ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| आदेश घोषित केल्याचा दिनांक | : | ०७-०१-२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | ०७-०१-२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | : | ०७-०१-२०२६ |